# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/11/2022 (सोमवार) दुपार

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा ईजनी शिवार येथे ०६/११/२०२२ चे १३.०० वा. ते १४.०० वा. सुमारास आरोपी नामे– महादेव चैतराम झंझाड, वय ३२ वर्ष, रा. मोरगाव हा त्याचे ताब्यातील महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. YUVO 475 DI क्र. एमएच–३६ झेड ५१५७ किंमती अंदाजे ३,००,०००/–रू. मध्ये सुर नदीच्या पात्रातील ०१ ब्रास रेती किमती अंदाजे २,०००/–रू. भरून विनापरवाना अवैध्यरित्या चोरून घेवुन जातांनी मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन अरोली करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील काटोल ते सावरगाव रोड जाम नदीचे पुलावर दिनांक ०६/११/२०२२ चे १२.३० वा. ते १२.५२ वा. चे सुमारास यातील मृतक नामे–योगेश रमेशराव रिठे, रा. काळे चौक काटोल हा आपली नबर नसलेली नविन गाडी मोपेड जुपीटर गाडीने शेतातुन घरी जात असता यातील आरोपीची ट्रेलर गाडी क्र. सि.जी /१३, एल–४६५१ चे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित आणुन त्यांचे गाडीवरचे नियंत्रन बिघडल्याने ट्रेलर गाडी क्र सि.जी/१३–एल –४६५१ हि मृतकाच्या अंगावर पडल्याने मृतक याचे मरणास ट्रेलर गाडी क्र. सि.जी/१३, एल–४६५१ चा चालक कारणीभुत ठरला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय महादेव रिठे, व ४८ वर्ष, रा. काळे चौक, काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ), १८४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन काटोल करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**